तात्काळ

क्रमांक: वैप्रबि. १५८९/२६७७/सीआर २९६/२०
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: एप्रिल १९८९
29 MAY 1989

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी [सर्व]
आयुक्त [सर्व]

विषय: कर्मचा-यांची औषध भरपाईची बीले.

संदर्भ: १] क्र. जिप/अर्थ/वै/औषध भरपाई/१२/८९ दिनांक ८.१२.८८
२] क्र. जिपना/अर्थ/वै/३८९/८९, दि. ८.३.८९

संदर्भित पत्राद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांनी वरील विषयांवर काही मुद्दे उपस्थित केले होते. सदर मुद्दे व त्यांचे स्पष्टीकरण सोबतच्या प्रपत्रात माहितीस्तव देण्यांत येत आहे.

[म. स. गद्रे]
कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग

सर्व सहाय्यक आयुक्त (विकास)
विभागीय आयुक्त कार्यालये
यांना माहितीसाठी अग्रेषित

क्रमांक जिप/सामान्य/लेखा/पुनर्वि-६०२/८९
उस्मानाबाद जिल्हा परिषद, उस्मानाबाद
सामान्य प्रशासन (लेखा) विभाग
दिनांक:- ५/६/८९

प्रतिलिपी माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी देण्यात येत आहे.

सर्व खाते प्रमुख/ विभाग प्रमुख, जि.प. उस्मानाबाद
सर्व गट विकास अधिकारी, पं. समित्या उस्मानाबाद

पत्रक पाठविले



www.lekhamitra.blogspot.com

प्रपत्र

| मुद्दे | स्पष्टीकरण |
|---|---|
| १] १४ मार्च १९८५ च्या शासन निर्णयाबरोबर प्रमाणपत्र "अ" व "ब" चा नमुना दिला आहे. त्या प्रमाणपत्रात असे नमूद केले आहे की, जी औषधे रोग्याला विहीत केली आहेत ती [ती] दवाखान्यात साठवली जात नाही व ती अन्न [ foods ], शक्तीची औषधे [ Tonics ] व जंतुनाशके [ Disinfectants ] नाहीत असे असतांनाही ब-याच वेळेला विहीत केलेल्या औषधांत Tonics असतात. उदा.Dextrose अशा प्रकारची वरील प्रमाणपत्राशी विसंगत औषधे विहीत केलेली असतात. केवळ वैद्यकिय अधिका-याने ज्या प्रमाणपत्रावी सही केली म्हणून अशा प्रकारच्या औषधाची भरपाई करावयाची का ? | शासनाने कोणती औषधे प्रतिपूर्तीस पात्र आहेत हे शासन निर्णय एमएजी १०६८/६०५११[अे] पी, दि. ११.२.७१ व १९.४.७२ व शासन निर्णय एमएजी १०७२/६००७२/एस, दि. २४.९.७३ नुसार ठरविलेले आहे. अन्न पदार्थ [ foods ] टॉनिक्स [ Tonic ] जंतुनाशके [Disintectants ] हे प्रतिपूर्तीस पात्र नाहीत ही धारण पक्की करण्यात येत आहे. [Dexfrose ] हे टॉनिक नाही हे जीवनावश्यक औषधी आहे. वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित करुन सही केली असली तरी वरील निर्णयाप्रमाणे सर्व बाबी [ Items ]तपासून पाहणे आवश्यक आहे. |
| २] हे प्रमाणपत्र व सोबतची औषधाची बीले ही पुढे लेखा परिक्षणांस महालेखाकार यांचेकडे जात असतात परंतु असे दिसते की, या प्रमाणपत्रात रोगाचे नांव लिहिलेले असते, ते लपेटित न वाचता येण्याजोगे असते. तसेच आणीबाणीच्या औषधोपचाराच्या भरपाईसाठी जे प्रमाणपत्र नमुना "क" विहीत केलेले आहे त्यांत सुध्दा Vital sigh observe, Alecessary emergency Investigation with results. इत्यादी स्तंभात वाचनिय अक्षरात माहिती नमूद केली पाहिजे, परंतु अनुभव असा आहे की, या ठिकाणी अवाचनीय अक्षरांत लिहिलेले असते, त्यामुळे बीले तपासतांना आजाराचा व औषधाचा व आणीबाणीचा अन्योन्य संबंध तपासता येत नाही. वस्तुत: हे प्रमाणपत्र व्यवस्थित व वाचनिय अक्षरांत भरले पाहिजे. जेणेकरुन तपासतांना प्रमाणपत्रांत नमूद केलेला रोग व विहीत केलेली औषधे त्याच रोगांवर आहेत की, नाही, हे तपासता येईल. अशी अवाचनीय अक्षरांत रोगाचे नांव लिहिले असल्यास रोग व औषधे यांचा अन्योन्यसबंध आढळून न आल्यास अशा बिलांची औषध भरपाई करावी का? याबाबत उदा. खाली दिली आहेत:- | आपण आपल्या कार्यक्षेत्रातील वैद्यकीय अधिका-यांना सुवाच्च अक्षरात किंवा प्रतिपूर्तीचे फार्म टंकलेखित करुन पाठविण्याच्या सूचना आपल्या स्तरावर काढणे योग्य राहील. |

अ] एका प्रमाणपत्रात रोगाचे नांव Hypertension...



www.lekhamitra.blogspot.com

| मुद्दे | स्पष्टीकरण |
|---|---|
| ३] काही प्रमाणात रोगाचे नांव या सदरात Anamia असे लिहिलेले असते. वस्तुत: आनामिया हा रोग नाही. शारिरिक अशक्तता म्हणजे Anamia व यासाठी Tonics च द्यावे लागतात. आणि प्रमाणपत्रानुसार [ Tonics ] च्या खरेदीवर केलेल्या खर्चावरील भरपाई मिळत नाही. तेव्हा Anamia हा रोग समजून औषध-खर्चाची भरपाई करावी का ? | ॲनिमिया हे शारिरात रक्त न तयार होण्यामुळे रोगाचे लक्षण आहे व त्यासाठी कित्येकदा बरीच औषधे घ्यावी. लागतात व वैद्यकीय अधिका-यांनी प्रमाणित केलेली व शासन निर्णय क्र. एमएजी१०६८/६०५११/[अे]पी दि. ११. २. ७१ व २९. ४. ७२ व शासन निर्णय एमएजी१०७२/६००७२/एस, दि. २९. ९. ७३ मध्ये मान्य असलेली सर्व औषधे प्रतिपूर्तीस पात्र राहतील. |
| ४] काही प्रमाणपत्रात आयुर्वेदाची तसेच युनानी औषधे विहीत केलेली असतात. परंतु प्रमाणपत्रावर सही जो वैद्यकिय अधिकारी करतो तो Alopathyची औषधे देणारा असतो. शासन प[illegible] क्र, नागरी विकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण क्र. एमएजी१०६८/७२०१/पी/दि. २५जानेवारी १९६९ मध्ये विहीत केले आहे की, अशा प्रकारची आयुर्वेदिक किंवा युनानी औषधांची भरपाई करावी. तथापि औषधोपचार शासकिय आयुर्वेदिक युनानी दवाखान्यातून व्हावा याचा अर्थ प्रमाणपत्रावर सही करण्यास वैद्यकिय अधिकारी हा युनानी/आयुर्वेदिक या शाखेतील पदवीधर असावा. असे असतांना ॲलोपथीचे वैद्यकिय अधिकारी या फॉर्मवर सही करतात हे गैर आहे. म्हणजे अशी औषधे यांची भरपाई करता येणार नाही. धारणा पक्की करावी. | आयुर्वेदीक पध्दतीचा उपचार करून घेतला असल्यास काही आयुर्वेदिक औषधी शासन परिपत्रक नागरी विकास सार्वजनिक आरोग्य व गृह निर्माण क्रमांक एमएजी१०६८/७२०१/पी, दि. २५. १. ६९ प्रमाणे या औषधाची भरपाई करता येते व शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य व गृह विभाग क्रमांक एमएजी१०६८/६०५११[अे]पी, दि. २९. ४. ७२ प्रमाणे औषधाची यादी दिलेली आहे. तिच औषधी प्रतिपूर्तीसाठी पात्र आहे अशा पध्दतीच्या उपचारावर ॲलोपॅथी शास्त्राच्या डॉक्टरांची सही चालणार नाही व अशा प्रमाणपत्रावर आयुर्वेदिक युनानी वैद्याचेच प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे. |
| ५] शासन निर्णय, ग्रा. वि. वि., क्र. डिएसआर-५/४९८३/१५७०/सीआर४९०/१७, दिनांक २ ऑगस्ट ८५ नुसार औषध भरपाई मागणा-या कर्मचा-याने विहीत नमुन्यात अर्ज करावे असे नमूद आहे. या अर्जाची एक प्रत बीलासोबत जोडणे आवश्यक आहे. कारण त्यातून रोगी कोण आहे. कुठे आजारी पडला, रोग कोणता? इत्यादीबाबतची संपूर्ण माहिती असते व ती बीले तपासण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे की, बीलाबरोबर विहीत केलेल्या अर्जाची प्रत जोडणे आवश्यक आहे. | शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र. डिएसआर-५/४९८३/१५७०/सीआर४९०/१७ दि. २. ८. ८५ मध्ये दिलेल्या सर्व सूचना तंतोतंत पाळण्यात याव्या. |

..3/-



www.lekhamitra.blogspot.com

६] शासन निर्णय, दि. १४.३.८५ नुसार काही रोगांच्या बाबतीत आणिबाणीच्या आजारांच्या प्रसंगी खाजगी अधिका-यांची औषध खर्चाची भरपाई करून देता येते. ब-याच वेळेस असे निदर्शनास येते की, आणिबाणीचा आजार दाखवून अशी बीले येतात वस्तुत: तसा तो आजार नसतो उदा. [१] एका मुळव्याध्याच्या औषध खर्चाच्या भरपाईच्या प्रकरणांत हा आणिबाणीचा रोगदाखवून
Severe hamareage
असा दाखविला वस्तुत:
Severe hamageage
याचा अर्थ अतिशय रक्तप्रवाह असा होतो. मुळव्याधाच्या केसमध्ये असे संभवत नाही असे झाले तरी रोगी बिछान्याला खिळून पाहिजे पण तसे नव्हते म्हणजे केवळ नामसदृश्याचा फायदा घेऊन औषध भरपाई घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

शासन निर्णय दि. १४.३.८५ च्या मध्ये दाखविलेल्या आणिबाणीच्या आजाराचे प्रमाणपत्र दिले असल्यास ते मान्य करणे योग्य आहे. एखाद्या मुळव्याधीच्या रोग्यास अतिप्रमाणात रक्तस्त्राव होऊ शकतो व त्यामुळे त्याची परिस्थिती [ Severe haemorrhage

या स्थितीत बसू शकते.

७] आणिबाणीच्या औषधोपचाराच्या वेळी रुग्ण खाजगी वैद्यकिय अधिका-याकडे दवाखान्यात भरती झालेला असतो या दवाखान्यात ह्या वैद्यकिय अधिका-याची जबाबदारी असते की, ठराविक वेळी भेट देवून रोग्याची तपासणी करणे, त्यामुळे अशा वेळी Visit fee देण्यात येऊ नये असे वाटते धारणा पक्की करावी.

१९.१०.८३ च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार खाजगी रुग्णालयात तात्काळ परिस्थितीत औषधोपचार घेतले असता तसेच मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेतले असता तेथील खर्च खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे. म्हणून अशा प्रसंगी व्हीजीट फी देखील देय आहे.

८] आणिबाणीच्या औषधोपचाराच्या बाबतीत असे दिसून येते की, सुश्रुषा-गृहाचे प्रती दिवसाचे भाडे ,ऑपरेशन चार्जेस इ. बाबत बराच फरक प्रत्येक वैद्यकिय अधिका-याच्या बाबत आढळून येतो या बाबत काही मानदंड निश्चित करता येतील का ? म्हणजे त्यानुसार बीले येतील.

खाजगी रुग्णालयातून लावण्यात येणा-या निरनिराळ्या दरावर कोणताही मानदंड सध्या अस्तित्वात नाही.

जर आपणास प्रतिपुर्ती प्रकरणे निकाली काढण्यात अडचण असेल तर आपण जिल्हा शल्य चिकित्सक नाशिक व उपसंचालक आरोग्य विभाग नाशिक यांचा सल्ला घेऊ शकता.



www.lekhamitra.blogspot.com